# जाहीर सूचना

# महाराष्ट्र शासन

## पर्यावरण विभाग, मंत्रालय,

नविन प्रशासन भवन, १५वा मजला, मादाम कामा मार्ग, मुंबई - ४०० ०३२

दिनांक : ०९/०८/२००८

१. नदी खोऱ्यांच्या क्षेत्रामध्ये उद्योगधंद्यांचे पर्यावरण विषयक स्थान नियमन या शासनाच्या दि. १५/७/२००० च्या धोरणाबाबत सर्वसाधारण जनतेकडून व सर्व संबंधितांकडून सूचना व हरकती मागविण्यात येत आहेत.

२. पर्यावरण विभागाने महाराष्ट्रातील नद्यांच्या खोऱ्यांच्या क्षेत्रामध्ये उद्योगधंद्यांचे पर्यावरणविषयक विनियमन करण्यासाठी स्थान नियमन धोरण दि. १५/७/२००० रोजी जाहिर केलेले आहे. हे विनियमन अंमलात आणण्याकरीता पर्यावरण (संरक्षण) अधिनियम १९८६ च्या कलम ५ व पर्यावरण (संरक्षण) नियम, १९८६ च्या नियम ४ (५) अन्वये राज्य शासनास असलेल्या अधिकाराचा वापर करून हे धोरण जाहिर केलेले आहे. या धोरणानुसार महाराष्ट्रातील २० नद्यांच्या खोऱ्यांच्या क्षेत्राचे नदीच्या पाण्याच्या विहीत वापरानुसार अ-१, अ-२, अ-३ व अ-४ असे वर्गीकरण केलेले आहे. अ-१, अ-२, अ-३ व अ-४ क्षेत्रातील नद्यांच्या पाण्याची गुणवत्ता विहित करण्यात आलेली आहे.

३. अ-१ या वर्गामध्ये नदीच्या उच्चतम पूररेषेपासून दोन्ही बाजूस तीन किलोमीटरपर्यंतच्या क्षेत्रात उद्योग उभारण्यासाठी प्रतिबंध आहे. त्यानंतरच्या पाच किलोमीटर पर्यंतच्या क्षेत्रात हिरव्या व नारिंगी संवर्गातील उद्योगांना योग्य ती प्रदूषण नियंत्रण यंत्रणा बसविल्यानंतर परवानगी अनुज्ञेय आहे. त्यापुढील म्हणजेच आठ किलोमीटर नंतरच्या क्षेत्रात कोणत्याही उद्योगांना योग्य ती प्रदूषण नियंत्रण यंत्रणा बसविल्यानंतर परवानगी देता येते.

४. अ-२ वर्गामध्ये नदीच्या उच्चतम पूररेषेपासून दोन्ही बाजूस एक किलोमीटरपर्यंतच्या क्षेत्रात उद्योग उभारण्यासाठी प्रतिबंध आहे. त्यानंतरच्या एक किलोमीटरनंतरच्या क्षेत्रात हिरव्या व नारिंगी संवर्गातील उद्योगांना योग्य ती प्रदूषण नियंत्रण यंत्रणा बसविल्यानंतर परवानगी अनुज्ञेय आहे. त्यापुढील म्हणजेच दोन किलोमीटरनंतरच्या क्षेत्रात कोणत्याही उद्योगांना योग्य ती प्रदूषण नियंत्रण यंत्रणा बसविल्यानंतर परवानगी देता येते.

५. अ-३ व अ-४ या दोन्ही वर्गामध्ये नदीच्या उच्चतम पूररेषेपासून दोन्ही बाजूस अर्धा किलोमीटरपर्यंतच्या क्षेत्रात उद्योग उभारण्यासाठी प्रतिबंध आहे. त्यानंतरच्या अर्ध्या किलोमीटरपर्यंतच्या क्षेत्रात हिरव्या व नारिंगी संवर्गातील उद्योगांना योग्य ती प्रदूषण नियंत्रण यंत्रणा बसविल्यानंतर परवानगी अनुज्ञेय आहे. त्यापुढील म्हणजेच एक किलोमीटर नंतरच्या क्षेत्रात कोणत्याही उद्योगांना योग्य ती प्रदूषण नियंत्रण यंत्रणा बसविल्यानंतर परवानगी देता येते.

६. अ-२ वर्गीकरणामध्ये सर्वसाधारण धोरणास अपवाद म्हणून अस्तित्वात असलेल्या महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या औद्योगिक क्षेत्रासाठी, ज्या ठिकाणी जमिन संपादीत करून विकसीत देखीलझाली आहे पण प्लॉट वाटप व्हावयाचे बाकी आहे अशा ठिकाणी, अ-२ या वर्गीकृत क्षेत्रात नदीच्या उच्चतम पूररेषेपासून दोन्ही बाजूस एक किलोमीटर ऐवजी ०.५ कि.मि.पर्यंतच्या क्षेत्रात उद्योग उभारण्यासाठी प्रतिबंध आहे.

७. उद्योगांची त्यांच्या प्रदूषण क्षमतेनुसार विशिष्ट रंगाने वर्गवारी करण्यात आलेली आहे. त्यानुसार अतिप्रदूषणकारी उद्योगांचे लाल, मध्यम प्रदूषणकारी उद्योगांचे नारिंगी तर कमी प्रदूषण करणाऱ्या उद्योगांचे हिरव्या रंगामध्ये वर्गीकरण करण्यात आलेले आहे. त्याबाबत अधिक माहिती महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या वेबसाईट http//mpcb.mah.nic.in वर उपलब्ध आहे.

८. शासनाने सदर धोरण जाहिर केल्यापासून मागील ७ ते ८ वर्षांमध्ये माहिती तंत्रज्ञान क्षेत्राचे उद्योग क्षेत्रात पदार्पण व परंपरागत उत्पन्न करणाऱ्या उद्योग क्षेत्रामध्ये वापरण्यात येणाऱ्या आधुनिक तंत्रज्ञानामुळे प्रदूषणाची निर्मिती कमी होणे, प्रदूषण प्रक्रिया यंत्रणा तंत्रज्ञानात झालेली सुधारणा इत्यादि बाबींचा विचार करून तसेच राज्यातीलनद्यांच्या प्रदूषणाची सद्य:स्थिती लक्षात घेऊन विशेषत: अ-१ व अ-२ वर्गीकरणातीलनद्यांच्या पाण्याचा स्त्रोत पिण्यासाठी वापरण्यात येतो अशा नद्यांच्या पाण्याची गुणवत्ता टिकविणे आवश्यक आहे.

९. या सर्व बाबींचा विचार करून नदीच्या धोरणातील अ-१, अ-२, अ-३ व अ-४ विशेषता: अ-१ व अ-२ या क्षेत्रात सुधारणा करण्याचे शासनाच्या विचाराधीन आहे. अ-१ व अ-२ या क्षेत्रामध्ये नद्यांच्या उच्चतम पूररेषेपासून नाविकास क्षेत्र, उद्योगांचे अंतर किती असावे याबाबत सर्वसाधारण जनता, पर्यावरण संघ, बाधीत पक्ष, पर्यावरण संस्था, औद्योगिक संघटना, उद्योग यांच्याकडून सूचना व हरकती मागविण्यात येत आहेत. या सूचना पोष्टाद्वारे, ई-मेलद्वारे, हातबटवड्याने अधिसूचना जाहिर झाल्यापासून ३० दिवसांच्या कालावधीमध्ये खालील पत्त्यावर सादर कराव्या.


सदस्य सचिव,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
कल्पतरु पॉईंट, ३रा मजला,
सायन-माटुंगा स्कीम रोड नं.-८, सायन, मुंबई - ४०० ०२२.
Email ID- mpcbeic@rediffmail.com


सही/-
सचिव (पर्यावरण),
महाराष्ट्र शासन

# PUBLIC NOTICE

## GOVERNMENT OF MAHARASHTRA

### Environment Department

15th floor, New Administrative Building,
Madame Cama Marg, Mumbai 400 032.

Date : 09/08/2008

1. Through this public Notice, objections and suggestions are called in respect of the River Policy Notification issued by the Environment Department, Government of Maharashtra vide G.R. No. MMV/2000/326/22/TB-3, dated 15th July, 2000 in respect of the Industrial Locational Policy which was issued u/s 5 of the Environment (Protection) Act, 1986 read with Rule 4(5) of the Environment (Protection) Rules, 1986. As per this policy, the River Catchment Area of 20 rivers have been classified in 4 categories i.e. A-I, A-II, A-III and A-IV, taking into consideration the designated use of river water. Similarly, the water quality has been prescribed for these categories.
2. For "A-1" Class of River Water from High Flood Level (HFL) on either side upto 3.0 kms. of the river, **"NO DEVELOPMENT ZONE"** is specified. Beyond 3.0 kms. from HFL upto 8.0 kms. on either side of the river, exclusively for the industries falling under **Green and Orange Categories with requisite pollution control devices** are permitted. Beyond 8.0 k.m. on either side of river, the industry/ies falling under any category with requisite pollution control devices is/are permitted.
3. For "A-II" Class of River Water- from High Flood Level (HFL) on either side upto 1.0 kms. of the river, **"NO DEVELOPMENT ZONE"** is specified. Beyond 1.0 kms. from HFL upto 2.0 kms the industries falling under **Green and Orange Categories with requisite pollution control devices** are permitted. Beyond 2.0 k.m. the industry/ies falling under any category with requisite pollution control devices is/are permitted.
4. For "A-III" and "A-IV" Class of River Water from High Flood Level (HFL) on either side upto 0.5 kms. of the river, "NO DEVELOPMENT ZONE" is specified. Beyond 0.5 kms. from HFL upto 1.0 k.m. the industries falling under Green and Orange Categories with requisite pollution control devices are permitted. Beyond 1.0 k.m. the industry/ies falling under any category with requisite pollution control devices is/are permitted.
5. The policy of siting of industries is also applicable to the industrial estates developed / to be developed by Maharashtra Industrial Development corporation (MIDC) except in case of the existing estates of MIDC, where land is already acquired and developed and allocation of industrial plots is not done, No Development Zone of 500 mtrs. has been specified for A-II Class of river.
6. Various industries are categorized in different colour as per the pollution potential i.e. **'Red'** (highly polluting), 'Orange' (medium polluting) and **'Green'** (less polluting). Additional information in this respect is available on the website of the MPCB :http://mpcb.mah.nic.in
7. With the changing technologies and advent of newer pollution treatment technologies, it is possible to reduce pollution.
8. Due to increased industrialization, the water quality in the rivers has been getting constantly deteriorated. Since A-I and A-II parts of the rivers are source of drinking water, it is eminent to take preventive measures to maintain the designated quality of water in these parts of the rivers.
9. Taking into consideration all above factors, it is under consideration of the State Government to review the "Industrial Locational Policy" from the environment point of view in the river catchments areas. Suggestions and objections are hereby invited from the public at large, environmental groups, affected parties, environmental institutions, industrial associations and industries about distance of industries/No Development Zone from HFL especially in A-I and A-II parts of rivers.

Written suggestions/opinions/objections can be submitted through post or email or hand delivery within 30 days from the date of issue of this Public Notice at following address.

**Member Secretary**
Maharashtra Pollution Control Board,
Kalpataru Point, 3rd Floor, Sion-Matunga Scheme Road No.8,
Sion (East) Mumbai 400 022.
Phone 24010706, Fax : 24023516,
Email ID : mpcbeic@rediffmail.com

sd/-
**Secretary (Environment)**
**Government of Maharashtra**